## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दिनांक : 24/08/2020

जाक्र. मऔविम/मुनि/ E33609/2020

### परिपत्रक

**विषय : मऔविम च्या औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक भूखंडाचे व्यापारी भूखंडात रुपांतर करणेबाबत.**

**संदर्भ :** परिपत्रक क्र. मऔविम/मुनि/503/2012 दिनांक 03/05/2012

महामंडळाच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावली-2009 मधील क्र. 17.3.2 नुसार Residential, Educational, Institutional, Assembly, Business, Mercantile इत्यादी साहाय्यभूत सेवांच्या (Support activity) वापरासाठी plotted area च्या 20% पर्यंत क्षेत्र अनुज्ञेय आहे. त्याप्रकरणी महामंडळाच्या दिनांक 30/11/2011 रोजी झालेल्या 344 व्या सभेतील मंजूर ठराव क्र. 5084 च्या अनुषंगाने महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक भूखंडाचे व्यापारी भूखंडात रुपांतर करण्याबाबतचे धोरण दिनांक 03/05/2012 च्या उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

सदर धोरणात सुधारणा करणेप्रकरणी संदर्भांकित परिपत्रकामधील अट क्र. 4 मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. 28/01/2020 रोजी झालेल्या 385 व्या बैठकीतील ठराव क्र. 6029 नुसार मान्यता देण्यात आली आहे.

सुधारित अट क्र.4**:**महामंडळाच्या यापूर्वी विकसित झालेल्या औद्योगिक क्षेत्रात मऔविम च्या सुधारित विकास नियमावली 2009 मधील नियम क्र. 17.3.2 नुसार साहाय्यभूत क्षेत्राच्या वापरासाठी अनुज्ञेय 20% क्षेत्रापैकी वाणिज्य (transportation, financial institution, business and mercantile, hotel) वापरासाठी एकूण plotted area च्या 5% पर्यंतच व्यापारी वापर अनुज्ञेय राहील. तथापि महामंडळाचे हित विचारात घेता सदर मर्यादा 10% पर्यंत करण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक राहील आणि याप्रकारे व्यापारी वापरात रुपांतरीत केलेले भूखंड केवळ लिलावाव्दारे वाटप करण्यात येतील. मात्र नव्याने विकसित करावयाच्या औद्योगिक क्षेत्रात वाणिज्य वापराखालील कमाल क्षेत्राची मर्यादा एकूण Plotted Area च्या 10% पर्यंत अनुज्ञेय राहील. यामध्ये मूळ नकाशामध्ये आरेखित केलेले व त्या व्यतिरिक्त तदूनंतर व्यापारी वापरासाठी रुपांतरीत केलेले तसेच रुपांतरासाठी प्रस्तावित असलेल्या भूखंडाचा समावेश राहील.

उपरोक्त सुधारित धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहील याची सर्व संबंधितांनी नोंद घेवून त्यानुसार कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई-93.

प्रत - 1) मा. मु.का.अ. मऔविम यांना माहितीकरीता सादर

प्रत - सस्नेह अग्रेषित -

1) सह मुकाअ (मा.तं), मऔविम (2) सह मुकाअ (डीएमआयसी), मऔविम

प्रत माहिती व उचित कार्यवाहीकरिता -

1. सर्व विभागप्रमुख
2. सर्व कार्यालयीन प्रमुख
3. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
4. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
5. सर्व विनिप्रा, मऔविम
6. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र
7. सर्व औद्योगिक संघटना
8. सुरक्षा नस्ती